
# साथीदार

Lesbian, Gay, Bisexual, Transgender Magazine

वार्षिक (२००४)



देणगी मूल्य : ५०/- रु. (स्थानिक) • ४ यु. एस. डॉलर्स (परदेशी)

# साथीदार
# (LGBT Magazine)

अनुक्रमणिका


१. संपादकीय ... १
*बिंदुमाधव खिरे*

२. नाटक- छोट्याशा सुट्टीत ... २
*मुलाखत*
*सचिन कुंडलकर,*
*मोहित टाकळकर,*
*सारंग साठ्ये*

३. सिनेमा- गर्लफ्रेंड ... ६
*मुलाखत*
*केतकी रानडे*

४. काउन्सेलिंगचं शिक्षण ... ९
*मुलाखत*
*सुनिता वाही*

५. *बिन बायकांचा तमाशा,* ... १२
राजसा तुम्हासाठी
*माहिती*
*भूषण*

६. *INFOSEM* ... १६
*रिपोर्ट*
*अभिजीत आहेर*



- साथीदार (वार्षिक २००४) (LGBT Magazine)
- संपादक/प्रकाशक/मुद्रक : बिंदुमाधव खिरे
- मुद्रणस्थळ : पुणे, भारत
- पत्रव्यवहार : khirebindu@yahoo.com OR khirebindu@hotmail.com
- फक्त खाजगी वितरणासाठी


- © सर्व हक्क सुरक्षित
- लेख व मुलाखतींमधील मते व विचार हे वैयक्तिक असून संपादक त्याच्याशी सहमत असतीलच असे नाही.


- देणगी मूल्य : ५०/- रु. (स्थानिक)
- ४ यु. एस. डॉलर्स (परदेशी)


## संपादकीय

*दिनांक : १, डिसेंबर २००४ पुणे*

लेखक : बिंदुमाधव खिरे

# दुसऱ्या अंकाच्या निमित्ताने

ॲलन होलींगहस्ट ला Line of Beauty साठी बुकर प्राईज मिळालं. मला खूप आनंद आणि अभिमान वाटला. ॲलन गे विषयावर अनेक वर्षे लिहीत आले आहे. मी त्यांना बुकर प्राईज मिळालं ही बातमी एका इंग्रजी आणि एका मराठी वर्तमानपत्रात वाचली.

इंग्रजी वर्तमानपत्रात लिहिलं होतं की या कादंबरीतला हिरो गे आहे. एका गे नॉव्हेलला बुकर प्राईज मिळायची ही पहिलीच वेळ आहे.

मराठी लेखात ही बातमी जवळपास तशीच होती. फरक होता तो गे रेफरेंसेस सगळे वगळले होते.

### अस्तित्व

या मराठी लेखात एका इंग्लंड मधल्या लेखकाच्या पुस्तकातल्या नायकाची लैंगिकता लपवणं इथल्या पत्रकाराला किंवा एडिटरला महत्त्वाच वाटलं. त्याच्या लैंगिकतेचं अस्तित्वच नाकारलं.

### विकृती

हा गे रेफरन्स वगळणं म्हणजे पत्रकार किंवा एडिटरला ही विकृती आहे असं वाटलं असलं पाहिजे. त्यामुळे हा शब्द (गे) एखाद्या बक्षिसप्राप्त पुस्तकाच्या नायकाला जोडण्याची काही जरूर नाही हा तर्क काढला असेल तर काही नवल नाही. हे एक उदाहरण. हे असलं 'ऑब्जेक्टीव्ह' रिपोर्टिंग अनेक वेळा माझ्या पहाण्यात आले आहे.

### आमच्यातलेच काही

काही लेख मी वाचले आहेत की जे अत्यंत होमोफोबिक आहेत आणि समलिंगी लेखकांनी लिहिले आहेत. एकजणाने ही हीन वृत्ती आहे अस लिहिलं आहे तर एका जणाने या असल्या इच्छा (समलिंगी संबंध) चांगल्या मार्गाने वळवाव्या असं लिहीलं आहे. या दुटप्पी धोरण असणाऱ्या लेखकांचं काय करायचं? यांना कोणती शिक्षा द्यायची?

### महत्त्व

म्हणूनच साथीदार महत्त्वाचे आहे. समलिंगी लोकांच्या अस्तित्त्वाचा एक छोटा का होईना महत्त्वाचा पुरावा आहे. नुसता पुरावा नाही तर आम्ही समलिंगी आहोत याचा आम्हाला अभिमान आहे, ही विकृती नाही, या इच्छा वाईट नाहीत हे ठामपणे सांगण्याचा एक मार्ग आहे. आमचे हक्क, अधिकार मागण्याचा, समस्या मांडण्याचा एक मार्ग आहे.

### प्रतिसाद

मागच्या अंकाला अपेक्षेप्रमाणे खूप कमी प्रतिसाद मिळाला. डिस्ट्रिब्यूशन हा एक महत्वाचा प्रॉब्लेम आहे. मराठी वाचक हा अंक घरी घेऊन जाऊ शकत नाहीत हा दुसरा प्रॉब्लेम आहे.

तरीही हा अंक जेवढी वर्षे शक्य होईल तोवर काढणं गरजेचं आहे. वरील नमूद केलेल्या होमोफोबिक प्रवृत्तीं विरुद्ध आवाज उठवणारी मासिकं असणं काळाची गरज आहे.

- बिंदुमाधव खिरे

---

# मुलाखत

*दिनांक :*
*१८, ऑक्टोबर २००४*
*पुणे*

# नाटक छोट्याशा सुट्टीत

### मुलाखत

लेखक : सचिन कुंडलकर

दिग्दर्शक : मोहित टाकळकर

अभिनेता : सारंग साठ्ये

### परिचय

एक लग्न करू पहाणारं जोडपं. एक लग्न न करून एकत्र रहाणारं जोडपं. लग्न करू पहाणारं एक 'गे' जोडपं आहे. दुसर जोडपं भिन्नलिंगी आहे. त्यांची नाती, त्यांचे संबंध यांचा वेध घेणारं हे नाटक आहे. यावर बिंदुमाधव खिरे यांनी सचिन, मोहित आणि सारंगची घेतलेली मुलाखत.

*

**बिंदू :** कल्पना कशी सुचली ?

**सचिन :** नाटक लिहून बघावं असं वाटलं. असं झालं नाही की कल्पना सुचली आणि आता याचं नाटक करावं का सिनेमा करावा, की कथा करावी. मी मोहित ची नाटकं बसवण्याची प्रोसेस बघत होतो. मला मोहितची नाटकं आवडतात. म्हणून उत्तरा आणि कार्तिकच्या नात्याबद्दल लिहावं असं वाटलं आणि बाकी मग लिहिता लिहिता तयार झालं. मी बसून लिहायला लागलो तेव्हा एक एक गोष्टी सेपरेट येत गेल्या. लग्न न करणारं एक जोडप आणि लग्न करू पहाणारं एक जोडपं यांच्यातल्या इंटरॲक्शनस्.

**बिंदू :** रिलेशनशिप कायमच फोकस होता का? रिलेशनशिप आणायचं कधी ठरलं?

**सचिन :** हो. ते स्पेसिफीक गे रिलेशन असेलच असं मनात नव्हतं: ते कदाचित लग्न करू पहाणारे पुरुष आणि स्त्री ही असू शकत होतं. पण मग तसं वाटलं (गे रिलेशनशिप होणं) आणि ते फ्लोमध्ये आलं. ते आल्यावर त्याला इंट्रेस्टींग डायमेंशन प्राप्त होतंय असं मला वाटलं.

**बिंदू :** गे जोडपं हे U.S.चं दाखवलं. असं कुठे मनात होतं किंवा दाखवायचं होतं का की ही नाती फक्त U.S. मध्येच असू शकतात किंवा टिकू शकतात?

**सचिन :** असं अजिबातच मनात नव्हतं. एका अर्थाने माझा स्वत:चा अनुभवाचा भाग असेल की अनेक देशांमधल्या मित्रांबरोबर माझा इमोशनल गिव्ह आणि टेक चालू असतो. त्यामुळे मला तो देश नावाचा मुद्दा इममटेरियल असतो. ते मी इकॉनॉमिक ग्लोबल व्हिलेज अशा अर्थी म्हणत नाही. मी असं म्हणतो की जग हा

माझा प्लॉट वाटतो आणि आपली माणसं या प्लॉटमध्ये खूप ठिकाणी आहेत. उदा : आता पॅरिस मधली दोन माणसं अशी आहेत की ती मला अत्यंत जवळची आहेत. दुसरं हे जोडपं इथलं (इंडिया) असतं तर हे नाटक तीन तासांचं करावं लागल असतं. इथली सगळी नाती, त्यातील ताण तणाव दाखवावा लागला असता. इतक्या सगळ्यांना अन्सरेबल करणं मला आवश्यक वाटलं नाही. नाहीतर त्यांचे आई, वडील, त्यांच्या स्टोऱ्या हे सगळं आलं असतं. मला इथं एका वाक्यात याचं (व्योमंचं) काय झालं आणि दोन वाक्यांत सायरसचं काय झालं हे दाखवता आलं. त्यामुळे ते कंपॅक्ट झालं.

**बिंदू :** हे माझ्या माहिती प्रमाणे पहिलं नाटक आहे ज्यात गे रिलेशनशिप दाखवली आहे. एक जोडीची गे रिलेशनशिप आहे. तू मला मागे म्हणाला होतास की तुला हा गे प्ले आहे असं वाटत नाही. का बरं?

**सचिन :** तू हे नाटक सेक्शुॲलिटीच्या चौकटीतून ५०% पाहिलंस. तसंच हे सिनेमावाल्यांवर ७०% नाटक आहे का? म्हणजे, मी चौकट काय ठरवतोय यावर ते अवलंबून आहे. मला वाटतं आपण आपल्याच आनंदासाठी समजूत करून घेतो की ते तसं होतं आणि त्यामुळे कुणाला ते गे नाटक वाटत असेल तर त्यांनी ते मानावं, पण मला तसं वाटत नाही. 'गे' हा फोकस नाहीये. नाती हा फोकस आहे.

**बिंदू :** तुला हे नाटक का करावंसं वाटलं? ह्या नाटकाचा फॉर्म 'ब्रेन सर्जन' आणि 'प्रतिबिंब' या नाटकांपेक्षा वेगळा आहे.

**मोहित :** सचिननी काहीही लिहिलं असतं तरी ते नाटक मी बसवलं असतं. त्यांनी ते नाटक लिहीत असताना मला काही भाग वाचून दाखवला होता. तेव्हापासूनच मला ते इंट्रेस्टींग वाटत होतं, आणि ते लिहून झाल्यावर अपार्ट फ्रॉम सचिनचं आहे ते नाटक म्हणून मला भावलं. वाटलं की हे केलं पाहिजे.

**बिंदू :** हे नाटक करताना तुझे इतर नाटकांपेक्षा वेगळे चॅलेंजेस कुठले होते?

**मोहित :** असं काही नाही. कारण प्रत्येक नाटक वेगळंच असतं. प्रत्येक नाटकाचा विषय वेगळा होता. यात एक गोष्ट महत्त्वाची होती की ते इतर नाटकांपेक्षा खूप इंटीमेट आहे. इंटर-पर्सनल रिलेशनशिपस्‌वर बेतलं आहे. मला माहिती होतं की हे मला कुठं करायचं. सुदर्शन रंगमंच सारख्या ठिकाणी करायचं (small, more intimate space) हे नाटक बसवायची प्रोसेस मात्र वेगळी होती. कलाकारांना खूप मोकळं सोडलं. नाहीतर मी नेहमी शब्दांबद्दल स्ट्रीक्ट असतो. कलाकारांना इमोशनस्‌ एक्सप्लोअर करायला वाव दिला. हे नाटक भिजत ठेवायला वेळ दिला. पूर्ण सोक होईपर्यंत. आधीची दोन नाटकं स्पर्धेसाठी होती. त्यामुळे त्यांना डेडलाइन्स्‌ होत्या. येवढ्या वेळात करायचंच. इथं डेडलाईन्स नव्हत्या. आपल्याला जेव्हा वाटेल की ते छान झालंय तेव्हा ते करायचं. दुसरा एक फरक होता की या अगोदरची नाटकं केली त्यात बहुतेक सगळीजणं माझ्या ओळखीची लोकं होती. माझ्या ग्रूप मधल्यांना मी निवडलं होतं त्या त्या पार्टसाठी. या नाटकात एक जण सोडता इतर कुणाबरोबर काम केलं नव्हतं. त्यांच्या बद्दल अगदी जेमतेम माहिती होती.

**बिंदू :** सचिन लिहीत असताना त्यात तुझा सहभाग होता? का जोपर्यंत त्याचं लिहिणं होत नाही तोपर्यंत तू पूर्णपणे बाजूला राहिलास?

**मोहित :** मी त्याच्या लिखाणात कुठंही नव्हतो. त्याने मला एक-दोनदा वाचून दाखवलं होतं इतकंच. सचिनचं हे पहिलं नाटक असल्यामुळे त्याला काळजी होती की याच नाटक होईल का? मी फक्त त्याला येवढंच सांगत होतो की तू लिही. त्याचं नाटक होईल की नाही याची तू चिंता करू नकोस. जास्तीत जास्त काय होईल? त्याचे दोनच प्रयोग होतील आणि लोक म्हणतील शी! काय नाटक आहे. त्यासाठी तुझी क्रियेटीव्ह प्रोसेस का थांबवतोस?

**बिंदू :** तुला वाचताना इतर जण कोणी असे समोर आले का? की हा भाग हा/ही करू शकेल?

**मोहित :** हो उत्तराच. ही काम करणारी विभा माझ्या समोर होती. स्ट्राँग विल्ड अशी. सारंगकडे पाहून मला वाटलं की त्याची बॉडी लँगवेज खूप चांगली आहे. खूप फ्लेक्सीबल आहे. त्याच्या बॉडीचं तो काहीही करू शकतो. त्याच्या चेहऱ्यावरती तीच व्हलनरॅबीलीटी हवी होती. कार्तिक मर्चंट नेव्हीतला असल्यामुळे मला तो

रोबस्ट हवा होता. चेहरा मात्र शांत असलेला. या तिघांच्या व्यतिरिक्त कोणी माझ्या डोळ्यांसमोर नव्हतं.

**बिंदू :** सारंग तुला 'गे' रोल करायला लागेल ही काळजीची गोष्ट होती का कधी?

**सारंग :** नाही. जेव्हा हे नाटक पहिल्यांदा वाचलं तेव्हा एक चांगली गोष्ट झाली की मोहितनी मला विचारलं 'की मला काही इनहीबीशनस् नाही आहेत ना? आणि त्याच दिवशी ठरलं की मी हा रोल करणार. नशिबानी त्याच्या ही डोळ्यांसमोर या रोलसाठी मीच आलो. एक दोन जणांना सुद्धा हे नाटक वाचत असतानाच वाटलं की हे काम मीच करावं. त्यावर ऑप्शन असं नव्हतं की हा नाही तर कुठला रोल करायचा.

**बिंदू :** होमोसेक्शुॲलिटीवर ॲक्टर्सना सेंसीटाईज करायला काय करायला लागलं? ॲक्टर्स ग्लॅमरच्या नादात पर्सनल ग्रोथकडे लक्ष देत नाहीत आणि ते सेंसिटाईजड् होतीलच असं नसतं.

**सचिन :** मी नाटकाच्या क्राफ्टचं होमवर्क नाही केलं. आता नाटक बघताना मला फ्लॉज दिसतात. पण मी डीटेल नोटस् काढल्या होत्या - कॅरॅक्टरचं रिपीटीशन कसं होईल, ट्रांझीट पॉइंटस् काय असतील, हे क्राफ्टचं होमवर्क मी केलं होत. या मासिकाच्या दृष्टीने तुझा होमोसेक्शुॲलीटीवर भर असेल तर मला काही होमवर्क करावं लागलं नाही कारण मी स्वतः होमोसेक्शुअल आहे. त्यामुळे हा सगळा इमोशनल क्राफ्ट हा माझा आयुष्याचा भाग आहे. होमवर्क नाही लागलं पण रिस्पॉनसीबीलीटी होती की स्टीरीयोटिपीकल कॅरॅक्टर्स होऊ देता कामा नाही. जबाबदारी होती आम्ही काहीतरी वेगळं सांगतोय हे लोकांना वाटू न द्यायची. दुसरं एथीकल प्रॉब्लेम्स् मधे न पडता त्याच्या पलीकडचं बोलायची. होमोसेक्शुॲलीटी म्हणजे मला काही वेगळं वाटत नाही. उदा - काही फेमिनिस्टस् म्हणतात की आम्ही वेगळे आहोत, आमचे प्रश्न वेगळे आहेत, बायकांचं बायकांशी वेगळं नातं असतं, पुरुष वेगळे असतात. मला असं कधी जाणवलं नाही. मला असं वाटतं की याच्या पुढे काहीतरी अेक्सप्लोरेशन हवं माणसाच्या आयुष्याचं. माझ्या भावनिक ताणतणावासाठी ही गोष्ट (समलैंगिकता) महत्त्वाची आहे. पण मी लिहिताना, मित्र जमवताना, कुणाशी बोलताना, कुणाचा सेक्शुअल प्रिफरन्स काय आहे हे ईममटेरियल आहे. मला माझा प्रेफरन्स महत्त्वाचा आहे, तुला तुझा, याला याचा, पण मला याचा सामाजिक डोंगर महत्वाचा नाही.

**मोहित :** होमवर्क हे करावंच लागतं. मग ते नाटक असो नाहीतर दुसऱ्या दिवशी एखादं प्रेझेंटेशन असो. यावेळी काही वेगळा होमवर्क केला असं मला नाही आठवत. पण एक होतं की सचिनच्या नाटकाचा इमोशनल कंन्टेट जो आहे तो जपणं माझी सर्वात महत्त्वाची जबाबदारी होती. असं एकदा वाटलं होतं की मेथड ॲक्टींग सारखं करावं. 'गे' लोकांच्या फिल्मस् दाखवू शकलो असतो. अशा शंभर गोष्टी करता आल्या असल्या. पण तेच मुळात करायंच नव्हतं. या इमोशन्स् सहजपणे याव्यात ही इच्छा होती. नाटकात पर्सनल ग्रोथ सगळ्यांचीच झाली. ॲज ॲन ॲक्टर ॲन्ड ॲज ह्यूमन बीईंग हे नाटक लोकांपुढे पोहोचताना सुद्धा खूप सेनसिटीव्हली पोहोचतंय.

**सारंग :** या कॅरॅक्टरचा असा वेगळा होमवर्क करायची जरूर नव्हती कारण होमोसेक्शुअल आणि हेटरोसेक्शुअलस् मध्ये फरक नाही हेच आपण सांगतो. मोहितला मी माझीच बॉडी लँग्वेज आणि आवाज वापरणं अपेक्षित होतं. त्यामुळे मी आहे तसा वागणं हे महत्त्वाचं होत. कार्तिक आणि व्योमचं रिलेशन हे एक गे' मुलगा लग्न करू पहातोय असं नसून एखादी फादर फिगर एका मुलाला किंवा मुलीला लग्नाआधी सांगेल असं होतं. आता ते कसं साकार करायचं हा फक्त प्रश्न होता. त्यामुळे होमवर्क १% किंवा १ पैसाच करावा लागला. सेन्सीटायझेशन बद्दल बोलायचं झालं तर माझ्या मते खूप झालं. कारण एवढं समरस होऊन मी कधीही काम केलेलं नव्हतं. याच्यातला शेवटचा सीन जो आहे, तो जेव्हा जाणार असतो त्या वेळचा -त्यावेळी मला जेवढा त्रास वाटला तेवढा मी केव्हाच कुठल्याच नाटकांत अनुभवला नव्हता.

**बिंदू :** तुम्ही नटांबद्दल होमोफोबिया घालवू शकला का? लेबल्स् आणि टॅगिंगच्या पलिकडे जायचं म्हणून तो सप्रेस केला का तो रिझॉल्व्ह करून पुढे गेलात?

**सारंग :** माझ्या आजूबाजूला मी इतक्या होमोसेक्शुअल लोकांशी डील केलंय की माझ्यात होमोफोबिया असण्याचा

प्रश्नच नाही. मला सुरुवातीला मोहितनी विचारलं होत की मी होमोफोबिक आहे का? मला याचा खरतर अर्थ माहित नव्हता. तो असण्याचा प्रश्नच नव्हता. मी सायरसला मिठी मारणं, कार्तिकच्या कुशीत झोपणं यात कुठेच मला प्रॉब्लेम जाणवला नाही. मला वाटतं आमच्यातला एकच जण रिझर्व्हड् होता आणि तू ट्रान्झीशनबद्दल बोलत असशील तर त्याच्यात नक्की फरक पडला. मला वाटतं सगळ्यांचाच प्रवास झाला, काहींचा कमी, काहींचा जास्ती.

**बिंदू :** या नाटकात 'गे' ॲक्टीव्हीजम बद्दल एक वाईट वाक्य आहे. हे वाक्य आवश्यक होतं का?

**सचिन :** ते जे वाक्य आहे 'ते सगळे वेडे आहेत' हे माझं वाक्य नाही. त्यामुळे मी त्याच्याबद्दल बोलण्यात अर्थ नाही. पण दोन गोष्टी सांगू इच्छितो - कॅरॅक्टर्स कशी वागावीत? कॅरॅक्टर्स ऐथीकल, मॉरल, उत्तम सामाजिक मेसेज देतील अशी एक पद्धत असते कारण तो मेसेज देण्यासाठीच नाटक लिहिलेलं असत. पण कॅरॅक्टर्स ह्यूमन आहेत. ते बेजबाबदार, इममॉरल काहीही असू शकताता. शेवटी काय होतंय हे महत्त्वाचं असतं. त्यामुळे ट्रान्झीशनमध्ये ते बेजबाबादार असू शकतील, चुकीचं बोलू शकतील, उर्मट असतील किंवा अजून काही. ती माणसं आहेत आणि त्यामुळे ती चुका करू शकतात. मी मेसेजची किंवा सामाजिक परिणामांची जबाबदारी मानत नाही.

मला पूर्वी वाटायचं की आपल्याला काय हवंय? हक्क हवेत का? एका अर्थी हो. पण ते मिळाले म्हणून आपण सुखी होणार आहोत का? मी आऊट होऊन माझे प्रश्न संपले का? नाही. मला वाटतं जगण्याचे जे सगळ्यांचे प्रश्न आहेत ते सगळ्यांचे सारखे आहेत. एकटेपणाचे आहेत, इमोशन हाकेला प्रतिसाद देण्याचे आहेत... त्यांना ॲडरेस करावं असं मला वाटतं. मी प्रश्न सोडवण्यासाठी होणाऱ्या चळवळीत - मग त्या फेमीनिस्ट असोत, गे' असोत त्याचं कॉन्ट्रीब्यूशन महत्त्वाचं आहे हे मी मानतो. मला चळवळ सुरू करणाऱ्या व्यक्तींबद्दल मनापासून आदर आहे. पण या चळवळीचे जे फॉलोअर्स आहेत त्यांनी स्वत:ला विचारायला हवं की त्यांना नेमकं काय हवंय.



कार्तिक आणि व्योम (छोट्याशा सुट्टीत)

**सारंग :** ते वाक्य माझं होतं. इम्प्रोव्हायझेशनमध्ये झालं. यशोदाबद्दल आणि सायरस या दोघांबद्दल मी टेररिझम हाच शब्द वापरत असतो. हे वाक्य त्या कॅरॅक्टरचं इरिटेशन दाखवतं. त्यामुळे मी फार चुकीचं बोलतोय असं वाटल नाही. ते वाक्य सायरसला उद्देशून होतं. ते सगळ्या गे' कम्युनिटीला उद्देशून नव्हतं.

**बिंदू :** या नाटकाच्या प्रतिसादाबद्दल काही प्रतिक्रिया?

**मोहित :** नाटकाला प्रतिसाद चांगला आहे. काही तरुण लोक घरी रुसून बसले आहेत, की काही नवीन केलं जात नाहीये. त्यांनी जरूर हे नाटक बघावं. काहीतरी खरंच केलं जातंय. ते चांगलंय की वाईट आहे हे तुम्ही पाहून ठरवा. पण जे रुसून बसले आहेत, की आता काहीच होणार नाही. त्यांनी जरूर हे नाटक बघावं.

**बिंदू :** छोट्या शहरात प्रयोग झाले आहेत का?

**मोहित :** आत्ता प्रयोग फक्त पुणे आणि मुंबईत झाले आहेत. अगदी इंटीमेट नाटक करत असल्यामुळे हे नाटक छोट्या शहरात कसं चालेल हे माहीत नाही. उदा - कोल्हापूर. त्यात गे' रिलेशनशिप असल्यामुळे आणि खूप इंटीमेट असल्यामुळे एक थोडी भीती आहे की नाटक चालू असताना एक जरी चीप कॉमेंट आली तरी स्टेजवरचा मूड बदलेल.

**पुढचे दोन प्रयोग - १८, १९ डिसेंबर २००४ संध्याकाळी ७:३० वाजता. सुदर्शन रंगमंच, पुणे.**

दिनांक :
२, नोव्हेंबर २००४
पुणे

# सिनेमा गर्लफ्रेंड

**मुलाखत**

केतकी रानडे या बापू ट्रस्टच्या CAMH (Centre for Advocacy in Mental Health) शाखेत काउन्सेलर आहेत. त्या 'सेहेर' हे बायकांसाठी सुरू करण्यात आलेलं काउंसेलींग सेंटर मॅनेज करतात. गर्लफ्रेंड हा नुकताच विवादास्पद चित्रपट येऊन गेला. त्याच्याबद्दल घेतलेली त्यांची मुलाखत.

*

**बिंदू :** हा सिनेमा बघावा असं का वाटलं? लेसबियन थीम असणार आहे हे माहीत होत का?

**केतकी :** मी एक लेख वाचला होता. 'गर्लफ्रेंड', 'जूली' आणि अशाच अजून एक दोन सिनेमांबद्दल. स्त्रियांची लैंगिकता किती उदारमतवादी दृष्टिकोणातून दाखवली जातीये हा या लेखाचा केंद्रबिंदू होता. पुणे टाईम्स का मुंबई टाईम्स मध्ये हा लेख वाचला होता. माझा पहिला विचार असा होता की खरंच आता उदारमतवादी दृष्टिकोण घेतला असेल. हा लेख पॉझिटीव्ह होता, मॅच्युरींग ऑफ हिंदी सिनेमा. पण त्याच वेळेला एक पाल मनात चुकचुकत होती की एवढा संवेदनशील विषय हिंदी सिनेमात कसा दाखविला जाईल. तो लेख वाचून चांगलं वाटलं होतं कारण मुळातच स्त्रियांच्या लैंगिकतेबद्दल फारसं लिहिलं जात नाही. लिहिलं तरी उदारमतवादी दृष्टिकोण नसतो. या विषयावर सिनेमा निघतोय म्हणून उत्सुकता होती. वाटलं की उशिरा का होईना या विषयावर सिनेमा निघतोय. Its high time. मी आणि माझी मैत्रीण सिनेमाला गेलो होतो. तिच्या मनातही हेच होतं की लेसबियानिझमवर काहीच बघायला मिळत नाही. 'फायर' नंतर हा विषय कोणीच उचलला नव्हता.

**बिंदू :** खरं पहाता फायर लेसबियन सेक्सवर आहे. लेसबियानिझमवर नाही.

**केतकी** : मला वाटतं की फायर आणि गर्लफेंड दोन्ही सिनेमे खराब आहेत. लेसबियन सेक्स फायरमध्ये दाखविला असला तरी त्यात लेसबियन स्त्रियांचं भावविश्व काय आहे हे कुठेच येत नाही. फायरमध्ये त्या दोघींचे संबंध पुरुष सुख देत नाही म्हणून निर्माण होतात. म्हणजे परत लेसबियानिझम पुरुषांशीच निगडीत आहेत हाच चुकीचा दृष्टिकोण. पण एक आहे. फायर मध्ये एवढी हिंसा नव्हती. ती विकृती आहे, अशा व्यक्ती वाईट आहेत असं कुठंही दाखवलं नव्हत. त्यामुळे त्या अर्थाने फायर बरा होता. 'गर्लफेंड' हे दुसरं टोक आहे. गर्लफ्रेंडमध्ये स्टिरीओटाईप्स आहेत. मुली लेसबियन का होतात याचं चुकीचं कारण दाखवलंय.

**बिंदू :** फायर एका बाईने डायरेक्ट केला होता. दीपा मेहता. ती पाश्चात्य देशात राहिली आहे. त्यामुळे तिने जास्त अभ्यास करून जास्त संवेदनशील सिनेमा काढणं अपेक्षित होतं.

**केतकी :** हो. मला फायर बघून खूप वर्ष झालीत पण एक आहे की मला आठवत नाही की फायर बघून मला त्रास झाला. हे जाणवत होतं की यांना हे कळलं नाही आहे, गैरसमज आहे पण तो अंगावर येत नाही. गर्लफ्रेंड लिव्हज यू हायली डिसगस्टेड.

**बिंदू :** तो सिनेमा बघत असताना काय वाटतं होत?

**केतकी :** पहिल्या वीस मिनिटात चित्र स्पष्ट दिसतं की ही जी गे रिलेशनशीप आहे ती सगळ्या स्टिरीओटाईप्सवर आधारली आहे. इशा इज अ कॅरीकेचर ऑफ अ बूच डाईक. लहानपणी तिच्यावर पुरुषांनी अत्याचार केले म्हणून ती पुरुषांचा द्वेष करते. ती ऑबसेस्ड आहे. ती सगळं पुरुषांसारखंच करते. ती व्हिलन आहे म्हणून तिला शिक्षा भोगावी लागते. म्हणजे ती मरते. ती दुसऱ्या भागात जरी हिंसक होत असली तरी पहिल्या अर्ध्या तासात रंग दिसायला लागतात की हे कुठल्या पातळीवरून दाखवलं जातंय आणि जाणार आहे.

दिवसभर ती एका डायमंड फॅक्टरीमध्ये कामाला असते. आणि रात्री पुरुषांशी बॉक्सिंग करून पैसे पण मिळवते. ते पैसे तिच्या गर्लफ्रेंडला देते. परत ती कशी पुरुष आहे हे दाखवणं. इथे कोपीकर इज द प्रोव्हायडर. तिने रेसर बाईक्स चालवणं, हिरो जॉगिंग करतो तर तिने जॉगिंग करत त्याच्या पुढे जाणं... द मुव्ही इज एक्सट्रीमली हेटेरोसेक्सीस्ट. एक माणूस वर असतो, एक खाली असतो. एक मोठा असतो एक छोटा असतो. जो मोठा असतो तो पुरुष असतो. आणि सगळ्या पुरुषी गोष्टी करत असतो. So there is a slap on the essence of womanhood. There is a slap on the essence of human relationships.

**बिंदू :** म्हणजे डायरेक्टरला भिन्नलिंगी नात्याचाच अर्थ अजून कळलेला नाही. तर तो समलिंगी नाती किती संवेदनशीलपणे मांडणार?

**केतकी :** खरंय पहिल्या वीस मिनिटांत मी माझ्या मैत्रीणीला विचारत होते की हा सिनेमा का काढला असेल? पैशाची गोष्ट जरी धरली तरी या लोकांनी काहीही होमवर्क का करू नये? म्हणजे मला वाटत की डायरेक्टर एक दिवस सकाळी उठून म्हणला असेल की आपण असं काहीतरी करून बघू. त्यामागे काहीही रिसर्च नाही, गे कम्युनीटीशी संपर्क साधणं नाही, काही नाही.

**बिंदू :** या सिनेमात एक बायकी गे पुरुष पण दाखवला आहे. तो ही स्टिरीओटाईप.

**केतकी :** एकदा ती डाईक बाहेर जाणार असते. तीची गर्लफ्रेंड एकटी राहू नये म्हणून हा गे तिच्या बरोबर रहाणार असतो. तिची काळजी घ्यायला. परत हे स्पष्ट आहे कि ही माझी प्रॉपर्टी आहे. तिला दूसऱ्या पुरुषाच्या हवाली कस करायचं? म्हणून मग तिला एक बायकी गे पुरुषाच्या स्वाधिन केलं. तो सारखा एखादं कुत्र दोन पाय वर करून कस उभं रहात तशी पोझ घेऊन उभा असतो. तो जरी फेमेनीन दाखवायचा असता तरी त्याचे अनेक फेमेनीन परस्पेक्टीव्हज दाखवता आले असते. पण नाही. येथे त्याला फ्लोरल प्रिंटचे कपडे आणि बायकी हावभाव.

अजून एक इंटरेस्टींग गोष्ट की हिरो 'हिरॉईनला' याच्याकडून भेटतो. याला हिरोमध्ये इंटरेस्ट आहे हे कळल्यावर हीरो त्याला पण याच्यात इंटरेस्ट आहे असं नाटक करतो. तिला मिळवण्यासाठी. त्या गे पुरुषाच्या भावनांची जाणीव त्या हिरोला नाही. त्याला फसवलं तर चालतं. त्याच्याशी खोट बोललं तर चालतं. त्याचा फक्त वापर करणं आणि टाकून देणं.

**बिंदू :** How does she have Lesbian sex ?

**केतकी :** यातलं त्या हिरॉईनचं लेसबियन सेक्स सुद्धा एकदा दारू प्याल्यावर होतं. म्हणजे 'माझ्या नकळत झालं' आणि एक एक्सप्लेनेशन तर इतकं रीडीक्युलस आहे की 'ती झोपल्यावर तिच्याबरोबर काय होतंय हे तिला नंतर आठवत नाही' तिला हा झोपेचा प्रॉब्लेम असतो. ती हिरॉईन (अरोरा) सुद्धा स्टिरीओटिपीकल आहे. तिला अजिबात मेंदू नाही. अगदी सरळ, सालस आहे. तिला काय चाललंय काही कळत नाही. पाऊण सिनेमा झाल्यावर हिरो तिला विचारतो. तेव्हा सुद्धा ती डिनायलमध्ये असते. हे तिघं एकदा गोव्यात असतात. तेव्हा रात्री हॉटेलमध्ये बॉयफ्रेंड हिरॉइनला म्हणतो कि तू माझ्या खोलीत ये. यावाना हिरो आणि डाईक मध्ये कॉम्पिटीशन सुरू झालेली आहे. हिच्यावर अधिकार कोणाचा? हे सगळं खूप मेल, माचो अँगलनी घेतलं.

**बिंदू :** तिच्या मॅचोगिरीमुळे त्या हिरोलाच फेमेनीन वाटत असेल.

**केतकी :** इट वूड बी व्हेरी इन्टरेस्टींग टू आस्क द हिरो तुझी इनसेक्युरीटी किती वाढली?

**बिंदू :** हा सिनेमा एखाद्या क्लोझेटेड कॉलेजमधल्या मुलीनी जर पाहिला, एक अशी मुलगी Some one who is struggling to come to terms with her sexuality तर तिला कशा प्रकारचा त्रास होईल?

**केतकी :** माझा या सिनेमावरचा राग ओसरल्यावर हेच मनात आले की आपली लैंगिकता स्वीकारण्याचा एक मोठा लांब प्रवास असतो. आयुष्यभराचा असतो. खूप वेदनामय त्रासदायक प्रवास असतो. अशा वेळी आपल्याला स्वीकारणारी माणसं भेटणं, अशा संस्था असणं, अशा कलाकृती बघायला मिळणं खूप महत्त्वाचं असतं. अशा वेळी आपल्याबद्दल असं काही वाईट ऐकणं, बघणं हे आपल्याला फार मोठ्या प्रमाणात हानिकारक बनतं.

आपल्याला खूप मागं नेतं. या फेजमध्ये माणूस खूप हळव असतं, व्हल्नरेबल असतं. याच काळात आत्महत्येचं प्रमाण जास्ती असतं. साहजिकच अशांचा स्वाभिमान ढासळणार, स्वत:बद्दलचा द्वेष वाढणार.

जर दोन लेसबीयन ज्या एकमेकांवर प्रेम करतात पण अजून एकमेकांशी या विषयावर बोललेल्या नाहीत त्यांनी असा सिनेमा पाहिला तर त्यांच्या नात्याबद्दलची कोणती प्रतिमा त्यांच्या समोर उभी राहील? हे आपलं भवितव्य आहे का? आपली इमेज कुठे तरी दिसावी या आशेने ज्या हा सिनेमा बघतील त्यांना डिपरेशन येणारच. ज्या एकट्या असतील त्या सुद्धा डिपरेस्ड होतील की आपण असे आहोत का? जे होतकरू कपल्स असतील त्यांचं प्रचंड नुकसान होणार आहे.

आणि शेवटी तो सिनेमा मोरॅलिस्टिक आहे. द डाईक डाईज. म्हणजे या बायकांचं असंच होतं. मरण हीच त्यांना योग्य शिक्षा. अजून मला इमप्लिकेशनबद्दल वाटतं की आम्ही जेव्हा सिनेमाला गेलो होतो, तेव्हा थेटरमध्ये समोर एका कॉलेजच्या मुलामुलींची रांग होती, माग काही पुरुष बसले होते. आणि मला भीती वाटत होती की पुरुष असे सिनेमे बघून बायकांकडे (ज्या बायका स्टिरीओटिपीकल नाहीत) कसं बघत असतील?

**बिंदू :** ते स्वत:च मुळात खूप इनसेक्युअर असतात.

**केतकी :** एक्झॅटली. ते अशा बायकांना काय शिक्षा करायचा विचार करत असतील? किंवा दुसरा एक मुद्दा - दोन मैत्रिणींची (ज्या समलिंगी नाही आहेत) इन्टीमसी कशी अफेक्ट होईल? लोक त्या दोघींकडे कसे बघतील?

**बिंदू :** 'कल हो ना हो' मुळे कॉलेजमधल्या जवळच्या दोन मित्रांना, किंवा एखाद्या गर्लफ्रेंड नसलेल्या मुलाला कांताबेन म्हणून चिडवायची सवय लागली आहेच. हिंदी सिनेमांनी सगळ एक्सप्लॉइट केलं आहेच. आता या विषयावर असे सिनेमे बराच काळ निघणार असं दिसतय की ज्यात समलैंगिकता, विनोद / टवाळी किंवा विकृती म्हणून दाखवणार. या सिनेमावर बंदी घालावी असे तुला वाटते का?


**केतकी :** ॲज अ सपोर्टर ऑफ फ्रीडम ऑफ एक्सप्रेशन मला वाटतं की या सिनेमावर बंदी घालणं बरोबर नाही पण हेही खरंय कि असल्या सिनेमांमुळे गे/लेसबियन लोकांना खूप त्रास होतो. त्यांना नैराश्य येतं. काहीजण आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. हे खूप सिरीयस आहे. त्यामुळे या सिनेमांना विरोध म्हणून आपण डायलॉग साधायला हवा. आश्विनी सुखथनकरचा 'Facing the Mirror' सारख्या पुस्तकांना जास्तीत जास्त पब्लिसीटी द्यायला हवी ही. दूसरी बाजू दाखवायला हवी. ही बाजू मांडत रहाणं खूप गरजेचं आहे. इंडियन कॉन्टेक्स्ट मधली गे अफरमेटीव्ह लिटरेचरची जाहीरात करणं खूप गरजेचं आहे. कारण असेच सिनेमे येत राहिले तर गे कम्युनिटीला खूप सिरीयस थ्रेटस् आहेत.

**बिंदू :** हा संवाद साधायला गेलो की एक मुद्दा सारखा मांडला जातो की आत्ता याच्यापेक्षा जास्त महत्त्वाचे प्रश्न आहेत. याबद्दल तू काय म्हणशील?

**केतकी :** प्रश्न हा नाही की किती टक्के लोकांना त्रास होतो. एक टक्का का पाच टक्का याला महत्त्व नाही. हा ईश्यू कम्युनॅलिझम इतकाच महत्त्वाचा आहे. हे जे इनव्हिजीबिलीटीचं जाळं आहे याच्यावर ही विधानं आधारलेली आहेत. रोटी, कपडा, मकान याच गोष्टी हे लोक महत्त्वाच्या मानतात. आत्ता नुकतीच एक फेमेनीस्ट बाई मला लेसबियन इश्यूबद्दल म्हणाली- 'मला खडी फोडणारी किंवा मजुरी करणारी एक लेसबियन बाई दाखवा' म्हणजे गरिबी, क्लास, इकॉनॉमिक इनडिपेन्डन्स् हेच खरे प्रश्न आहेत असे तिला सुचवायचं होतं. तिच्या दृष्टीने स्त्रियांची लैंगिकता ही एक लक्झरी आहे. फेमेनिस्ट मुव्हमेंट मधली एक नावाजलेली बाई जर ही अशी विधाने करते तर बाकीच्यांचं काय? मला एका फेमेनिस्टला समजावून सांगायला लागणं की लेसबियानिझम काही फक्त मलबार हिलवर नसतं, ही खरंच शरमेची गोष्ट आहे. ही स्थिती आपल्या सोकॉल्ड सेक्यूलर, लिबरल लोकांची. मी तिला चिडून विचारलं की तुम्ही कधी या बायकांना त्यांच्या लैंगिक गरजांबद्दल विचारलंत का? कि तुम्हाला कशाने शारीरिक सुख मिळतं? तुम्ही ठरवलं की त्यांना पैशाने सुख मिळतं. बरोबर? जवळ आरोग्य केंद्र नाही म्हणून मुलाला डायरिया झाला कि चार किलोमिटर घेऊन जावं लागतं... त्यांच्या आरोग्य हक्कांबद्दल भांडलात. हे सगळं ठीक आहे. पण तिला विचारलंत का की तिच्या शारीरिक सुखाची संकल्पना काय आहे? या

वरूनच कळतं की आपण काय प्रायॉरीटीजवर काम केलं. That is the reason the Gay movement has not taken off.

सेक्शुॲलिटी हा एक आस्पेक्ट आहे. पण ओव्हर ऑल फोकस सगळा फिजीकल वेलबीईंगवरच आहे. उदा. किती कंडोम वाटले. क्वॉलिटेटीववर लक्षच नाही. उदा. मी ओरीसात वादळ झालं तेव्हा गेले होते. तिथे शेल्टर्स बनवणं चाललं होतं. एक ऐंशी वर्षाची बाई बसली होती. घराच्या मागे तिच्या मुलाचं प्रेत होतं. तिला सगळे सांगत होते की वृद्धांसाठी जवळ एक आश्रम बांधला आहे. तिथे तुमची रहायची सोय केली आहे. ती बाई सुन्नपणे बसली होती. ती ते काय बोलतायत हे कळायच्या पलीकडे होती. पण तिला भावनिक आधार कोणाचाच नव्हता. आणि अशाच तऱ्हेची फिजीकल इंटरव्हेंशन्सच चालू होती. आपल्या इथे लोकांच्या ओव्हरऑल इमोशनल गरजांकडे पूर्णपणे डोळेझाक केली जाते. त्यात लैंगिक भावना पण आल्या. असं दुर्लक्ष करून लोकांचं खूप नुकसान होतं, आयुष्याचं वाटोळं होऊ शकतं. हे कोणी लक्षातच घेत नाही. या इमोशनल निग्लेक्टमुळे माणसाच्या क्वॉलिटी ऑफ लाइफमध्ये किती फरक पडू शकतो ही समजच आपल्या देशात नाही आणि याला काही अंशी तरी कारण पॅटरीआर्की आणि कॅपीटॅलीझम आहे. मी कॅपीटॅलीझम ॲज अँटीथेसिस टू सोशॅलिझम असं म्हणत नाही.




**सेहेर, पुणे**
**(स्त्री मानसिक आरोग्य केंद्र, ब्रांच ऑफ CAMH-सेंटर फॉर ॲडव्होकसी इन मेंटल हेल्थ, पुणे)**

हेल्प लाईन : (०२०) २६८३ ७६४७
(सामवार ते शनिवार ९:३० ते ५:३०. दुसरा आणि चौथा शनिवार सुट्टी)
इ-मेल : wamhc@vsnl.net
वेबसाईट : http://www.camhindia.org
पत्ता : B1/11, B1/12, ६वा मजला, कोनार्क पुरम, कोंढवा खुर्द, पुणे - ४८.

# मुलाखत

*दिनांक :*
*१०, नोव्हेंबर २००४*
*पुणे*

# काउन्सेलिंगचं शिक्षण

सुनीता वाही या अनेक वर्षे काउन्सेलिंग कॉलेजेसमध्ये शिकवताहेत. त्यांनी मागची अनेक वर्षे एच. आय. व्ही / एडस्, व्यसनमुक्ती, फॅमिली काउन्सेलिंग, कॅन्सर सर्व्हावर्सचं, समलैंगिक मुला-मुलींचं काउन्सेलिंग केलं आहे. त्यांच्याशी काउन्सेलिंगवरचे त्यांचे अनुभव यावर घेतलेली मुलाखत.

*

**बिंदू :** माझा समज आहे की काउन्सेलर्सना बाहेर फार महत्त्व दिलं जात नाही. तुमचा अनुभव काय आहे?

**सुनीता :** हो बरोबर आहे. पण त्याला बहुतांशी काउन्सेलर्सच जबाबदार आहेत. एकतर आत्ताचं काउन्सेलिंग जे होतं ते सगळं सुपरफिशीयल आहे. वरवरचं आहे. काऊसेलर्सनी ज्या मुद्द्यांवर काम करायला पाहिजे ते हाताळतच नाहीत कारण त्यांना स्वत:लाच काही विषयांबद्दल अस्वस्थता वाटते. काही विषयांची त्यांचीच हाताळायची तयारी नसते. त्यामुळे कित्येकवेळा ते मुळापर्यंत पोहोचू शकत नाहीत.

दुसरी गोष्ट म्हणजे काउन्सेलर्स स्वत:ला डॉक्टरांपेक्षा कमी दर्जाचे मानतात. त्यामुळे कुठंतरी डॉक्टर म्हणजे बॉस आहे आणि आपण जे तो / ती सांगेल तसंच केलं

पाहिजे ही धारणा असते. काउन्सेलर्सची स्वत:ची एक आयडेंटीटी आहे याची मुळात जाणीव नसते. डॉक्टरांना काउन्सेलर्स कमी दर्जाचे आहेत असे वाटते. काउन्सेलर्सनेही स्वत:ला कमी लेखलं आहे. स्वत:चं काम कमी मानलं आहे. त्यामुळे एक हायरारकी मानली जाते. डॉक्टर वरती काउन्सेलर्स, खालती.

तिसरं कारण काउन्सेलिंग क्षेत्रात येणारे खूप जण हे त्याचं ग्लॅमर / झगमगाट बघून येतात. त्यांना कामापेक्षा त्याचं जे समाजसेवेचं वलय आहे हे महत्त्वाचं वाटतं. काउन्सेलिंग करणं खूप अवघड आहे. त्यात सारखं स्वत:ची मूल्यं बघणं, स्वत:ची वाढ पण महत्त्वाची असते. स्वत:ला सारखे प्रश्न विचारावे लागतात. त्यांची उत्तरं शोधावी लागतात. हे करायची कोणाचीही तयारी नसते.

**बिंदू :** आत्ता जे काउन्सेलर्स बनतात त्यांना काउन्सेलिंग म्हणजे काय हे माहीत आहे का?

**सुनीता :** नाही. आत्ता जे ते करतात ते सुपरफिशीयल बीफ्रेंडींग करतात. त्यांना काउन्सेलिंगची बेसिक प्रिन्सिपल्स सुद्धा माहीत नसतात. त्यांची स्वत:ची वृत्ती खूप संकुचित असते. स्वत:च्या ज्या धारणा आहेत, कल्पना आहेत त्याच्यावर विचार करायची तयारी नसते. स्वत:ला प्रश्न विचारायची तयारी नसते. विशेषत: लैंगिकतेसारखा विषय. जिथे आपण स्वत: या विषयाबद्दल अस्वस्थ होतो तिथे क्लायंटशी आपण कसा काय संवाद साधणार? त्याला/ तिला कसं कंफरटेबल करणार? काउन्सेलिंगमध्ये एच. आय. व्ही. / एडस्, मॅरीटल काउन्सेलिंग, लेबर रिलेशन, चाईल्ड अब्यूज इ. प्रकार आहेत. या कुठल्याही विषयात काउन्सेलर्स सेक्स / सेक्शुअॅलिटीबद्दल बोलत नाहीत. आणि आपण पाहिलं की लक्षात येईल की प्रत्येक क्षेत्रात सेक्स / सेक्शुअॅलिटीचा संबंध आहे. तो विषय गाळून कसा चालेल? प्रत्येकाच्या काही शारीरिक, मानसिक गरजा आहेत त्या पुऱ्या करण्याची धडपड नैसर्गिक आहे. हेच जर आपण स्वीकारत नाही तर क्लायंट बरोबर कसं काम करणार?

MSW (Masters in social work) चे शिक्षक सुद्धा या विषयाबद्दल खूप उदासीन असतात. शिक्षकच काय सिलॅबस सेट करणारे सुद्धा खूप अनकम्फरटेबल असतात. Right from top to bottom nobody is comfortable. विद्यार्थी फिल्ड वर्क करतात, केसवर्क करतात. पण केसवर्कच्या वेळी कधीही या विषयावर बोललं जात नाही. विद्यार्थ्यांनी जरी बोललं नाही तरी त्यांचे जे गाईडस् आहेत त्यांनी बोलायला हवं. मगच विद्यार्थी बोलतील. उदा. निरोध वापरा एवढंच सांगणं पुरेसं नाही. न वापरण्याची कारणं काय, कंडोम प्रात्यक्षिक, कंडोम देणं, नॉनइन्सरटीव्ह सेक्सच्या प्रकाराची माहिती देणं या सगळ्या गोष्टी कव्हर व्हायला हव्यात. शिक्षक म्हणून लैंगिकतेशी निगडीत असलेल्या सगळ्या गोष्टी मोकळेपणाणी बोलायची मला सवय पाहिजे कारण ती माझी जबाबदारी आहे, कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांना काहीही येत नाही, काहीही माहिती नाही. मग हे बाहेर गेल्यावर काय करणार? यांचा कामाचा दर्जा काय असणार?

**बिंदू :** किती M S W च्या विद्यार्थ्यांना मॉडेलवर कंडोम लावायला शिकवलं जातं?

**सुनीता :** नाही शिकवलंच जात नाही. म्हणजे एच. आय. व्ही. चे काउन्सेलर्स क्लायंटला कंडोम कसा वापरायचा हे दाखवू शकत नाहीत. पण ही तर खूप पुढची गोष्ट झाली. विद्यार्थ्यांना लैंगिकतेवर संशोधन करायंच असतं पण त्यांना लैंगिक शिक्षणच दिलेलं नसतं. यांना पाळी म्हणजे काय, पुरुष नसबंदी म्हणजे काय या साध्या गोष्टीसुद्धा माहीत नसतात आणि सगळ्या काउन्सेलर्सच्या मनात हे समाजसेवेचं वलय. त्याचं ग्लॅमर. म्हणून सगळ्यांनाच एच. आय. व्ही. / एडस्, CSW (Commercial sex workers), गे लोकांबरोबर काम करायचं असतं. लेकिन बेसिक फंडे गोल है ।

**बिंदू :** या सगळ्यांना सेक्शुअल मायनॉरीटीजचा उद्धार करायचा आहे का?

**सुनीता :** हो हो. बघण्याचा दृष्टिकोणच चुकीचा आहे. आम्ही सुपीरीअर आहोत. त्यामुळे क्लायंट हा बिचारा समलिंगी, बिचारी वेश्या, बिचारा खेडेगाववाला, बिचारा अशिक्षित...

The counselors impose their own views and biases on the client. Since the client are a vulnerable lot we make things worse for them.

**बिंदू :** हेटरोसेक्शुॲलिटी न समजून घेता होमोसेक्शुॲलिटीवर या लोकांना काम करायचंय?

**सुनीता :** फार वाईट स्थिती आहे. या सगळ्यांनाच सेक्शुअल मायनॉरिटीज बरोबर काम करायचंय. सेक्शुअल मायनॉरीटीजना बऱ्याच प्रॉब्लम्सच्या समोर जावं लागत. घरच्यांकडून, समाजाकडून त्यांना भरपूर त्रास होतो. त्यात असे काउन्सेलर्स असणे म्हणजे त्यांचा त्रास वाढवणे. म्हणजे काउन्सेलर असे म्हणणार की 'ठीक आहे मी स्वीकारतो की तू समलैंगिक आहेस पण....' तो पण वापरून काउन्सेलर त्याच्या मनात अपराधीपणाची, शरमेची भावना आणतोच. मला जर माझी भिन्नलैंगिकता जस्टीफाय करायची जरूर नाही तर होमोसेक्शुअल्सना का ती सक्ती? काउन्सेलर्स / डॉक्टर्स कोणालाच समलैंगिक लोकांना उपदेश द्यायचा अधिकार नाही. आम्हाला तुमचा अनुभव नाही. तुमच्या जागी असतो तर काय केलं असतं हे आम्ही सांगू शकत नाही. मग आम्ही कोण तुम्हाला सल्ला देणारे?

त्यात परत एच. आय. व्ही. / एडस् काउन्सेलर्सना पैसे जास्ती मिळतात. आठ ते दहा हजार रुपये. त्या मानाने इतर काउन्सेलर्सना तीन एक हजारच रुपये मिळतात. त्यामुळे सुद्धा लोकांना एच. आय. व्ही. काउन्सेलर्स बनायचं असतं. पण सेक्शुॲलिटी सिलॅबसमध्येच नाही. असलाच तर तुमचं तुम्ही वाचा आणि शिका. या विषयाच्या सामोरी जायचीच तयारी नाही.

विद्यार्थ्यांना हीच जर शिकवण आहे की सेक्स करायच्यावेळी मुलगा / नवरा काय करायचं ते करील, तू स्त्री म्हणून काही करायची आवश्यकता नाही. त्यामुळे स्वत:च्या गरजा स्त्रिया विचारातच घेत नाहीत. आता अशी मुलगी जर एच. आय. व्ही. काउन्सेलर झाली तर ती एक लग्नाबाहेर संबंध ठेवणाऱ्या स्त्रीला कसं काउन्सेलिंग करेल? अजून अनेक विद्यार्थी आहेत ज्यांना सेक्स फक्त रिप्रॉडक्शनसाठीच आहे असं वाटतं. विद्यार्थीनी म्हणतात स्त्रियांनी सेक्सच्यावेळी कसा काय पुढाकार घ्यायचा? तो फक्त नवऱ्यानेच घ्यायचा असतो. हे काय काउन्सेलिंग करणार?

वर्कशॉप, लेक्चर्स सगळी सुपरफिशीअल आहेत. So at the end of two years they are at the same stage they were two years ago. I think we actually end up confusing them more. त्यांना माझ्यासारख्यांकडून एका बाजूने ओढले जात आहे आणि ट्रॅडिशनल शिकवणं हे सगळे मुद्दे झाकून ठेवतात. त्यामुळे ते जास्तीच गोंधळून जातात.

**बिंदू :** आणि हेच विद्यार्थी पुढे शिक्षक बनतात.

**सुनीता :** This is a vicious cycle. हे नवीन पिढीला काय शिकवणार?

**बिंदू :** हा डेडलॉक कसा सोडवायचा?

**सुनीता :** एक सेकंद आपण शिक्षकांना विसरू. आपण जर काही निवडक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकलो... दहा टक्केच धरू. साठचा वर्ग धरला तर पाच सहा विद्यार्थी जरी आपण चांगले तयार करू शकलो तर हा डेडलॉक हळूहळू का होईना नक्की मोडेल. कॉलेजमधले नाही तर बाहेरचे चांगले शिक्षक बोलवून हे शिक्षण दिलं पाहिजे. अशी दरवर्षी आपण पाच सात मुलं जरी डोळ्यांसमोर धरली तर फार मोठी प्रगती होईल.

**बिंदू :** यातसुद्धा कॉलेजच्या फ्रेमवर्कमध्ये हे शिक्षण देणं अवघड आहे. तुमच्या सारख्या फार क्वचित भेटतात ज्या कॉलेजमध्ये सेक्शुॲलिटीबद्दल मोकळेपणे बोलतात.

**सुनीता :** हो हे खरं आहे.

**बिंदू :** मग यासाठी एक पॅरलल सिस्टिमची जरूर आहे का? कॉलेजच्या बाहेर मुलांना शिकवायंच?

**सुनीता :** It make sense. कारण कॉलेज तर नक्की करणार नाही. मी बरीच वर्षे या क्षेत्रात आहे. पण फार काही फरक पडलेला नाही. प्रत्येक स्पेशलायझेशनच्या आधी सेक्शुॲलिटी कव्हर करायची. A, B, C पासून सुरुवात करायची कारण लैंगिक शिक्षण, लैंगिकता प्रत्येक विषयात येतेच. उदा. शाळेतल्या विद्यार्थ्यांना जरी काउन्सेलिंग करायचं म्हणलं तर आपण बघतो की वयात यायच्या आत हल्ली मुलं ब्यू फिल्मस् बघतात. इंटरनेटवर पोर्नोग्राफी बघतात. याच्यामुळे बरेच गैरसमज निर्माण होतात. काउन्सेलर्सना हे गैरसमज दूर करता आले पाहिजेत.

**बिंदू :** यासाठी काउन्सेलर्सना ब्यू फिल्मची माहिती हवी. आणि आपल्याकडे पोर्नोग्राफी इललिगल आहे.

**सुनीता :** काउन्सेलर्सना ब्यू फिल्मबद्दल माहिती नसेल तर क्लायंटच्या शंका कशा निरसन करणार? मुलांना वाटतं लिंगाचा सरासरी आकार १० इंच, सेक्शुअल स्टॅमिना पाऊण तास, कुत्र्याबरोबर सेक्स ह्या गोष्टीबद्दल बोलणं आवश्यक आहे, अचूक माहिती देण गरजेचंय. काही लोक ब्यू फिल्मस् बघून तसंच करायचा प्रयत्न करतात. त्यांना वास्तवाचं भान आणून दिलं पाहिजे.

**बिंदू :** पोर्नोग्राफी लिगलाईज करणं खूप आवश्यक आहे.

**सुनीता :** हो. म्हणजे त्याबद्दल चर्चा करता येईल. एकटे रहाणाऱ्यांना पोर्नोग्राफिमुळे सेक्शुअल टेंन्शन घालवायला मदत होईल. पोर्नोग्राफी गैर असली तरी खूप लोक ब्यू फिल्मस् बघतात. हे इललिगल करून उलट त्यांची अपराधी पणाची भावना तुम्ही वाढवता आहात. परिस्थिती अजूनच वाईट करत आहात. हे इललिगल असल्यामुळे क्लायंट मोकळेपणाने बोलूपण शकत नाही. काऊन्सेलर्सना पोर्नोग्राफि दाखवली पाहिजे. ते लिटरेचर वाचायला, बघायला दिलं पाहिजे. त्यात जो जार्गोन वापरला जातो तो त्यांना माहिती असला पाहिजे. या सगळ्यांबद्दल बोलताना अजिबात अस्वस्थता वाटता कामा नये.

**बिंदू :** Because of this moralistic stand by the government and society the students are completely screwed up by the time they land up in college.

**सुनीता :** Exactly. आपल्याला हे सांगण्याची खूप जरूर आहे की दोन व्यक्ती जर प्रौढ असतील, दोघांना राजीखुशीने लैंगिक संबंध ठेवायचे असतील तर त्यांनी काय करायचं, कस करायचं, केव्हा करायचं हे सगळं त्यांच्यावर सोपवलं पाहिजे. मग एक पुरुष, एक स्त्री असो, दोन पुरुष असोत किंवा दोन स्त्रिया असोत. या नैसर्गिक गरजा आहेत आणि काय बरोबर, काय चूक हे सांगायचा कोणालाही अधिकार नाही.

---

**माहिती**

*दिनांक :*
*१५, नोव्हेंबर २००४*
*मुंबई*

# बिन बायकांचा तमाशा, राजसा तुम्हासाठी

लेखकाचे नाव : भूषण
मोबाईल : ९८९२००९३५७
इमेल : bhushank23@yahoo.com

*

तब्बल १५ मिनिटांच्या प्रतीक्षेनंतर तिसरी घंटा होते. शिवाजी मंदिरच्या ए.सी. हॉलमध्ये आता अंधार झालाय. पडद्याआडून ढोलकीचे आणि घुंगरांचे आवाज ऐकू येतायत. फुलांचा आणि अत्तराचा घमघमाट पसरलाय. सगळे कलाकार चेहऱ्यावरुन मेकमपचे शेवटचे हात फिरवतायत. आज त्यांच्या कार्यक्रमाचा ५० वा प्रयोग आहे. आणि प्रमुख पाहुण्या आहेत, लावणीसम्राज्ञी 'सुलोचनाबाई चव्हाण'.

पडदा उघडतो. गण होतो, आणि प्राथमिक निवेदनानंतर मुजऱ्याला सुरुवात होते. लाल, सोनेरी काठाच्या रेशमी साड्या चापून चोपून नेसलेल्या पाच नृत्यांगना पाठमोऱ्या दिसतात. हळूहळू ढोलकीच्या तालावर त्यांचे पाय थिरकू लागतात. एका क्षणी पदर डोक्यावरून दूर होतात. आणि समोर उभं असतं - साक्षात् लावण्य. सर्व प्रेक्षक अचंबित होऊन पाहत असतात. कारण समोर नृत्य सादर करणाऱ्या या देखण्या स्त्रियांच्या वेषातील पुरुष असतात. 'बिन बायकांच्या तमाशा' चा तो सुवर्णमहोत्सवी प्रयोग असतो. आणि पुरुषांच्या या अनोख्या मुजऱ्याने सारं थिएटर भारावून गेलेलं असतं.

नितेश जाधवचं अप्सरेलाही लाजवाणारं सौंदर्य, प्रकाश पवारांचा खानदानी आदब, अनिल हेकारेंचा गावरान ठसका आणि आनंद सारमचं विजेहूनही लखलखणारं

तेजस्वी नृत्य. यांच्या जोडीला इम्रात सेहगल, किशोर, गणेश, संतोष कदम, योगेश माने, विकी सिंग, सुनील गुर्जर, योगेश कांबळे असे एकापेक्षा एक गुणी नर्तक शिवाय स्त्री-पुरुष दोघांच्याही आवाजात लीलया गाणारे जयेश काळे, विनय कोळी, निलेश पेटकर सारखे गायक, नृत्यदिग्दर्शक अनिल वासुदेवन (बिन बायकांचा तमाशा) आणि मंगेश भगत (राजसा तुम्हासाठी) यांचे हे कार्यक्रम म्हणजे गुणी व मेहनती मुलांचं आगारच आहे.

मुजरा संपून आता गवळण, जोगवा असा तमाशा रंगत जातो. एव्हाना समोर नाचणारे कलाकार स्त्री नसून पुरुष आहेत हे सर्वजण विसरून गेलेयत. त्यांच्या एकेक अदा बघून प्रेक्षकांतले पुरुष घायाळ होतायत आणि त्यांचा Perfect get up आणि make up पाहून स्त्रिया मनोमन दाद देतायत. 'अहो सांगा राया, सांगा मी कशी दिसते' या त्यांच्या प्रश्नाला 'Simply amazing' असं एकमुखी उत्तर मिळतं. 'गोऱ्या गोऱ्या पायात काटा रुतला', 'नवऱ्यानं सोडलिया दारू', 'ऊसाला लागला कोल्हा' .. गाणी चालूच आहेत. लावणीची नशा भिनत जातेय. 'दिसला ग बाई दिसला' मध्ये बेभान नाचणाऱ्या आनंदच्या acrobatic कसरती पाहताना डोळयांची पापणी सुद्धा लवत नाही. एवढ्यात मध्यंतर होते.

दुसरा अंक चालू करण्यापूर्वी एक छोटासा समारंभ होतो. "अशी देखणी आणि घरंदाज लावणी बऱ्याच दिवसांनी पाहायला मिळाली. एकेक कलाकार म्हणजे रत्न आहे, रत्न. संपूर्ण आयुष्य ओवाळून टाकलं तरी त्यांची दृष्टी निघणार नाही". मोजक्या शब्दांत सुलोचनाबाई बरंच काही बोलून जातात.

कार्यक्रम पुन्हा सुरू होतो. 'आली ठुमकत' या 'पिंजरा' मधल्या गाण्यावर निलेश जाधवची दिलखेचक अदाकारी पाहून हे गाणं त्याच्यासाठीच लिहिलंय की काय अशी शंका येते. हे नृत्य म्हणजे कलेचा अत्यंत श्रेष्ठ नमुना आहे. एखाद्या मनस्वी कलाकाराने कोऱ्या कागदावर कुंचल्यांचे फटके मारावेत तशा सहजतेने निलेश वावरतो- 'डोकं फिरलंया' मधल्या बयेचं झपाटलेपण इम्रान इतकं हुबेहूब उभं करतो की पाहणाराच झपाटून जातो. 'हिरवा शालू', 'कुठं कुटं जायाचं हनिमूनला', 'मुंबईची केळेवाली' अशा खट्याळ - श्रृंगारिक लावण्यांनतर लावणी कलावंतांचा दुर्दैवाचे दशावतार चितारणारी 'पोटासाठी नाचते मी' ही लावणी सुरु होते. 'लाज धरा पावनं तुम्ही - जनाची मनाची' असं सांगणारी प्रकाश पवारांची आणि अनिल हंकरीची हतबल नायिका बघून क्षणभर सुन्न व्हायला होतं. शेवटचा मुजरा सुरू होतो आणि पडदा पडल्यावरही टाळ्या वाजतच राहतात.

तिकडे 'राजसा तुम्हासाठी' चा प्रयोगही दिमाखात चालू असतो. बिन बायकांच्या तमाशातून बाहेर पडून, प्रमोद कांदळकरने स्वत:चा नवीन कार्यक्रम सुरू केला. 'कारभारी दमानं', 'गेली कुठं गावंना', 'खेळताना रंग बाई होळीचा' ही प्रमोदची हुकुमी गाणी. या लावण्या सादर करताना एकदा त्याला पाहिलं की दुसऱ्या कुणाची त्या गाण्यांवर कल्पनाही करता येत नाही. 'राजसा' सुलतान, प्रकाश, संजय सावंत, तेजस अशी ताकदीची मुलं आहेत. विशेष उल्लेख करावासा वाटतो तो मंगेशचा. एकाच वेळी नृत्य, गायन, आणि अदा अशी तिहेरी भूमिका तो लीलया पार पाडतो. 'या रावजी, बसा भावजी', गाताना आणि त्यावर अदा करताना त्याला जो कोणी बघेल तो फिदा झाल्याशिवाय राहणार नाही. 'बुगुबुगु वाजतंय' मधला संजय सावंत (पुरुष) आणि प्रकाश सरोदे (स्त्री) यांची अदा अशीच थक्क करणारी. बिन बायकांच्या तमाशाचं टायटल साँग लिहिणारा विद्यासागर शास्त्रीय नृत्य शिकलेला आहे. पतंग उडवीत होते,' बुरख्याची गाडी तो वेगळ्या प्रकारे सादर करतो. 'नको मारू रे कान्हा पिचकारी', 'घुंगरु तुटले रे'. 'थंडीचा महिना', एकामागून एक गाणी सुरू असतात. लावणीचा रंग हळूहळू चढत असतो. इतक्यात मंद प्रकाशात संथ संगीत सुरू होतं.

'झाल्या तिन्ही सांजा' मधला शांत, हळुवार, प्रसंगी करुण भाव प्रमोद, प्रशांत आणि सुलतान तिघंही नेमका पकडतात. आणि हे साधं गाणं मनावर आपला ठसा उमटवून जातं. मंगेश, विद्यासागरचे once more items चालूच असतात. आणि अर्थातच प्रमोदची मदमस्त, आव्हानात्मक नायिका जेव्हा प्रेक्षकराजाला खुणावते, वेडावते, इशारे करते तेव्हा भारावून जाण्याशिवाय बिचाऱ्याकडे गत्यंतरच नसतं.

यांच्यामधील काही कलाकार स्त्री म्हणून स्त्रियांच्या नावाने लावणी व इतर नृत्यांच्या कार्यक्रमातून काम करायचे. त्यावेळी त्यांच्या वाट्याला आलेल्या एक-दोन नृत्यांतच

त्यांची छाप पडत असे. त्यांना प्रमुख स्त्री कलाकारांइतकाच किंवा कधी त्याहूनही जास्त प्रतिसाद मिळाल्यामुळे त्यांना हुरूप आला आणि फक्त पुरुषांचा असा हा लावणी शो करायची कल्पना सुचली. सुरुवातीला प्रतिसाद अल्प होता, पण हळूहळू mouth publicity च्या जोरावर बुकींग मिळू लागलं. सगळं काही सुरुळीत चालू असताना आर्थिक बाबतीत मतभेद झाल्यामुळे प्रमोदने कार्यक्रम सोडायचा निर्णय घेतला.

'मला माझ्या मुलाचा अभिमान वाटतो. He is a great dancer' प्रेक्षकांत बसलेले योगेश मानेचे वडिल म्हणतात. बहुतेकांच्या घरून त्यांना पाठिंबा आहे. पण काही जणांच्या घरी वडिलांपासून ही गोष्ट लपवण्यात आलीये. 'मला माझ्या वडिलांनी घराबाहेर काढलं,' ग्रामीण भागातून आलेला एक कलाकार म्हणतो. 'सध्या मी मुंबईत माध्याच्या खोलीत एकटाच राहतो.'

या मुलांपैकी कुणीच या कार्यक्रमांवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून नाहीत. प्रत्येक प्रयोगाचे २०० ते ५०० रुपये मिळतात. सुरुवातीचे १५-२० प्रयोग फुकट करावे लागतात. शिवाय साड्या, दागिने, मेकअप यांचा खर्च स्वत:चा करावा लागतो. कित्येक साड्या त्यांनी स्वत:च design केल्यायत. हौसेला मोल नसतं हेच खरं. अर्थात आर्थिक प्रश्न किती दिवस दुर्लक्षून चालेल ही शंकाच आहे. काही अपवाद वगळता सर्वच मुलं कनिष्ठ मध्यमवर्गातील आहेत. नृत्याचे इतर शोज करणं, क्लासेस घेणं, ब्युटिशियनची कामं, शिवणकाम इत्यादी व्यवसायांत ते आहेत. यातले बहुसंख्य मराठी भाषिक असले तरी काही पंजाबी, मुसलमान, साउथ इंडियन मुलंही आहेत. अर्थात प्रत्येकालाच मराठी उत्तमप्रकारे बोलता येते.

प्रत्येक गाण्यात नवीन साडी असते. मग बरोबर ब्लाऊज, गजरे, दागिने, मेकअप सगळंच बदलावं लागतं. शिवाय ऐनवेळी परीक्षा, आजारपण यामुळे कोणी येऊ शकलं नाही तर त्याची गाणी करावी लागतात. विलक्षण मोहक रंगाच्या साड्या, दोन्ही नाकांत नथी, मोठ्ठी मंगळसूत्रं, टिकल्यांचे विविध प्रकार, नक्षीदार रंगीत बांगड्या, बाळी, कमरपट्टे, जाळीचा पदर अशी त्यांची creativity पाहून त्यांचा फॅशनचा सेन्स किती जबरदस्त आहे हे लक्षात येतं आणि हे सगळं लावणीचा पारंपरिक बाज सांभाळून केलं जातं हे विशेष.

"स्त्री म्हणून नाचताना बऱ्याच गोष्टींची काळजी घ्यावी लागते". प्रमोद सांगतो, "साड्या नेसायची पद्धत, मेकअप याचबरोबर उभं राहण्याची ढब, चालणं, चेहऱ्यावरील भाव अशा बारीकसारीक गोष्टींना खूपच महत्त्व असतं. चेहऱ्याची आणि शरीराची फार काळजी घ्यावी लागते. "स्टेजबाहेर मी चारचौघांसारखा वागतो याचं माझ्या आईवडिलांना जास्त समाधान वाटतं." सुलतान म्हणतो.

त्यांचा performance अत्यंत energetic असतो सतत भिंगरीसारखं गोलगोल फिरणं, पाठीची कमान, गुडघ्यांवर पडणं, भुवयांच्या मादक हालचाली यात एक प्रकारची नैसर्गिक सहजता दिसते. आणखी एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे double meaning च्या लावण्या सादर करतानाही मादकतेची मर्यादा ओलांडली जात नाही. अश्लीलता आणि उन्मादकता यांतला फरक त्यांना चांगलाच समजतोय. अर्थात त्यांनी फार उन्मादक हालचाली केल्या तर ते बीभत्सपणाकडे झुकण्याची जास्त शक्यता आहे हेही तितकंच खरं.

लावणी हे लोकनृत्य आहे की शास्त्रीय नृत्य हा वाद नेहमीच रंगतो. पण या दोन्ही कार्यक्रमांमध्ये लावणीचं एक क्लासिकल रूप पहायला मिळतं, जे क्लासेसबरोबर मासेसनाही तितकंच भावतं.

असे हे 'जरा हटके' शो बघताना प्रेक्षक इतका रंगून जातो की त्याला प्रत्येक लावणीला once more द्यायचा मोह होतो आणि कमाल म्हणजे लावणी once more सादर करताना हे सर्व कलावंत नवीन स्टेप्स, नवीन अदा करतात.

त्यांचं नृत्य पाहताना भाषेचे, संस्कृतीचे सगळे पडदे गळून पडतात. आमच्या अनेक अमराठी, अभारतीय, NRI मित्रांनी हे कार्यक्रम पाहिले आणि आपल्या मराठमोळ्या लावणीवर ते फिदा झाले. "भाषा न समजताही मी ३ तास खुर्चीला खिळून राहिलो." एका फ्रेंच प्रेक्षकाचे उद्‍गार.

पुरुषांनी स्त्री भूमिका करणं ही भारतात पूर्वापार चालत आलेली गोष्ट आहे. दशावतार, मराठी संगीत नाटक, शिवाय शास्त्रीय नृत्य-संगीतातही हे सर्रास चालतं. परंतु पुरुषांनी लावणीच्या स्त्रीप्रधान क्षेत्रांत पाऊल ठेवणे ही फारच नावीन्यपूर्ण बाब आहे. परदेशातलं Drag culture

आणि आपली लावणी यांच हे दिमागदार fusion हा काही नवीन trend आला का हे येणारा काळच ठरवील.

*

**चेतन दातार :** मी या कार्यक्रमांचा मोठा चाहता आहे. या शोजमुळे लावणीमधे एक 'fresh air' आली. नटण्यामध्ये जास्त बारकावे व सौंदर्यदृष्टी आली. असं म्हटलं जातं की पुरुषांना स्त्रियांच्या मेकअप व हेअर स्टाईलबद्दल स्त्रियांपेक्षा जास्त जाण असते. ते या कार्यक्रमांतून दिसून येतं. यातले ४-५ नर्तक हे अत्युकृष्ट दर्जाचे आहेत. पण इतर मुलांना improvement करावी लागेल. कारण कलाकाराने सतत प्रयोगशील असलं पाहिजे आणि performance अधिकाधिक सुधारण्याकडे लक्ष दिलं पाहिजे. मी माझं नवीन नाटक 'जंगल में मंगल' पृथ्वी फेस्टिव्हलसाठी सादर करतोय ज्यात cross -casting आहे म्हणजे स्त्रिया पुरुषांच्या भूमिकेत आणि पुरुष स्त्रियांच्या भूमिकेत काम करणार आहेत. Midsummer Night's Dream वर आधारित हे विनोदी नाटक बसवताना मला या कार्यक्रमांचा फार फायदा झाला.


विहंग कलामंच सादर करीत आहोत,

मंगल निर्मिती कृत

## नटले तुमच्यासाठी



(मऱ्हाटी लावणी)

संकल्पना व दिग्दर्शन

अभिजित आहेर, प्रकाश सरोदे

लेखन : दीपक राऊत

आपल्या सर्व मित्रमंडळी, कुटुंबीय आणि नातेवाईकासह एकत्र बसून पहावा असा कार्यक्रम

- प्रयोगासाठी संपर्क -

दीपक राऊत - ९८९२६९१९३३


अभिजित आहेर - ९८१९९८७९४२

E-mail : abhijit.aher@gmail.com



समलैंगिकतेवर आधारीत मराठी कादंबरी

## पार्टनर



**लेखक : बिंदुमाधव खिरे**

E-mail : khirebindu@yahoo.com

मूल्य : ७५ रुपये

उपलब्ध : रसिक साहित्य, पुणे

बुक्स अन् बेकरी, पुणे

द हमसफर ट्रस्ट, मुंबई

## INFOSEM

*दिनांक :*
*२०, नोव्हेंबर २००४*
*मुंबई*

INFOSEM : (Indian Network for Sexual Minorities)
लेखक : अभिजित आहेर

*

अनेक संस्थांनी कार्यकर्त्यांनी / प्रतिनिधींनी कित्येक वर्ष एलजीबीटी (समलिंगी स्त्रिया/पुरुष, बायसेक्शुअलस/ हिजडे) समाजासाठी आजवर काम केलं. इनफोसेमचा या सगळ्या संस्थांना, कार्यकर्त्यांना एकत्र आणण्याचा महत्त्वाचा उद्देश.

दिनांक ११ ते १४ ऑगस्ट २००४ या कालावधीत हॉटेल रॉयल गार्डन, जूहू, मुंबई येथे द हमसफर ट्रस्ट या संस्थेने पहिली कार्यशाळा भरवली. या कार्यशाळेसाठी द हमसफर ट्रस्ट या संस्थेच्या कार्यकर्त्यांशिवाय इंफाळ (मणिपूर), पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश, दिल्ली, राजस्थान, गुजराथ व महाराष्ट्रातून पुणे व मुंबई येथील एकूण ६८ शिबिरार्थींनी भाग घेतला.

पहिल्या दिवशी इनफोसेमची कार्यकारिणी निवडली गेली. या कार्यकारिणीमध्ये M S M ग्रूप (पुरुष जे समलिंगी संबंध ठेवतात), लेस्बीयन ग्रुप (समलैंगिक स्त्रिया), तृतीयपंथी ग्रूप अशा प्रकारे देशाच्या चार भागांतून १२ सदस्यांची निवड करण्यात आली. द हमसफर ट्रस्ट या संस्थेचा इनफोसेमचा अधिकृत संवाददाता निवडला गेला

पुढील तीन दिवस संस्थांच्या कारकिर्दीतील अनुभव देवाणघेवाणीचे होते. अनेक चर्चासत्र व कार्यशाळा या संदर्भात तीन दिवसांमध्ये भरवल्या गेल्या. सर्व चर्चासत्र तसेच कार्यशाळा संस्थांच्या गरजेप्रमाणे आखण्यात आल्या.

या चर्चासत्रांमध्ये संस्थांना एलजीबीटी (LGBT) ग्रुप कसे स्थापन करायचे, लैंगिक अल्पसंख्याक समाज प्रबोधन तसेच एकमेकांसोबत कशाप्रकारे संबंध स्थापित करावयाचे, लैंगिक अल्पसंख्याकांचे प्रश्न समाजापर्यंत कसे पाहोचवायचे, समुपदेशन (VCTC) तसेच रक्त तपासणी केंद्रे कशी स्थापन करावयाची, गुप्तरोगांचे उपचार कसे करावे, वैद्यकीय कार्यक्रम कसे राबवायचे व त्याकरिता लागणाऱ्या तांत्रिक बाबी याविषयी माहिती पुरवली गेली. समलिंगी स्त्रियांच्या मन:स्वास्थ्याबद्दल, लैंगिक स्वास्थ्याबद्दल, त्यांच्यासाठी मोकळेपणाने व सुरक्षितपणे एकत्रित येण्यासाठी स्वतंत्र जागेची निर्मिती व समलिंगी समाजात जनजागृती या संदर्भात चर्चासत्रे झाली.

मुंबईतील वेगवेगळ्या ग्रूप्सबाबतची माहिती व त्यांच्या सोबत संवाद साधण्याची संधी हमसफरने उपस्थित सर्व २२ संस्थांना उपलब्ध करून दिली.

हमसफर संस्थेच्या कार्यपद्धतीबद्दल व कार्याबद्दल सर्व सहभागी संस्थांना माहिती देण्यात आली.

शेवटच्या दिवशी श्री. के. के. अब्राहम, अध्यक्ष, एच. आय. व्ही. पॉझिटिव्ह नेटवर्क फॉर इंडिया यांनी एच. आय. व्ही. पॉझिटीव्ह लोकांच्या उपचारासाठी संस्थांनी एकमेकांसोबत कसे संबंध प्रस्थापित करावे, वाढवावेत आणि त्यातून परस्परांना कोणते फायदे होतील याची सविस्तर माहिती दिली. हा दिवस गाजला तो एलजीबीटी ग्रूपच्या नेत्यांनी/प्रतिनिधींनी/सहभागांनी भारतातील गेल्या दहा वर्षांच्या एलजीबीटी प्रवाहाबाबत/चळवळीवर अनेक ताशेरे आढले. योगायोगाची गोष्ट म्हणजे १९९४ साली भारतातील पहिले समलैंगिक संमेलन आयोजित केले ते हमसफरनी अन् त्याच संस्थेने आज भारतातील पहिली इन्फोसेम कार्यशाळा भरविण्याचा बहुमान मिळवला.

इनफोसेमच्या चार दिवसांच्या कार्यशाळेत सहभागी होणारे जास्तीत जास्त सदस्य हे समलैंगिक समाजात अनेक वर्षे तळागाळापर्यंत काम केलेले असल्याने संमेलन खऱ्या अर्थाने एलजीबीटी समाजाचे, समाजासाठी, समाजाने केलेले संमेलन होते.

या कार्यशाळेच्या उभारणीत खालील संस्थांनी मदत केली

फॅमिली हेल्थ इंटरनॅशनल, मुंबई जिल्हा एड्स् नियंत्रण कक्ष व आय. एस. व्ही. आय.